पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण), गुन्हे शाखा, मुंबई

---

**-: प्रेसनोट :-** दिनांक - २७/०६/२०२६

**पोलीस अधिकारी म्हणून बनाव करत असलेल्या तोतया अधिका-यास गुन्हे शाखेकडून अटक केल्याबाबत.**

कक्ष-१, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई येथे प्राप्त तक्रारीवरुन **'एक संशयित इसम वय अंदाजे ५४ वर्षे हा वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याचा बनाव करुन बनावट शासकिय ओळखपत्रे व पोलीस लिहलेली पाटी असलेल्या मोटार कारचा वापर करुन त्याच्या इतर साथीदारांसह बँकेतून कर्ज मंजूर करुन देण्याच्या बहाण्याने नागरिकांकडून पैसे घेऊन त्यांची फसवणूक करीत असल्याची तक्रार प्राप्त होती.'**

सदर प्राप्त माहितीचे अनुषंगाने मानवी व तांत्रिक तपास कौशल्याचा वापर करुन सदर संशयीत इसम हे हॉटेल 'The Leela', अंधेरी, मुंबई येथे येणार असल्याची माहिती प्राप्त होताच कक्ष-१ चे पोलीस पथकासह सदर ठिकाणी सापळा रचून दिनांक २६/०६/२०२६ रोजी एकूण तीन संशयीत इसमांना पोलीस पाटी असलेल्या राखाडी रंगाच्या MH12XH9447, TATA PUNCH मोटार कार सह ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर संशयीत इसमाकडे वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याची बनावट शासकिय ओळखपत्रे इतर बनावट कागदपत्रे मिळून आली आहेत.

सदर संशयीत इसम यांचे विरुध्द गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई येथील गु.र.क्र. ७२/२०२६ कलम २०४, २०५, ३१८(४), ३१९, ३३६(३), ३३७, ३४०, ३(५) भारतीय न्याय संहिता (सहार पोलीस ठाणे ०५७८/२०२६) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

यातील आरोपी क्रमांक ३ याचा गुन्हे अभिलेख पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. | कलम |
|---|---|---|---|
| १ | कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे | ३६४/२०२५ | ३१८,१३६(२), ३(५) भारतीय न्याय संहिता |
| २ | साकीनाका पोलीस ठाणे | ४५९/२०१८ | १४९, ४६५, ४६७,४६८, ४७१,१२०(ब) भा.दं.वि.. |
| ३ | खेरवाडी पोलीस ठाणे | १८२/२०१८ | ४६५, ४६७,४६८,४७१, ४२०, ३४ भा.दं.वि. |

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री कृष्ण कांन्त उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन व मा. सहायक पोलीस आयुक्त (डी/दक्षिण) श्री. दिनकर शिलवटे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष-१, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. गणेश पिसाळ, स.पो.नि. श्री. देविदास लाब्धे, स. पो.नि. श्री. सांगळे, पो.ह.९८०२८९/शिंदे, ९६०८७६/सानप, ९७१८४१/जुवाटकर, ०८११८७/वेडगे, पो.शि. ११३७१२/शिंदे, १३०३७५/केळकर, १७१०६७/ठाणेकर व चालक पो.शि.३१७००१/सालके यांनी पार पाडली आहे.

Scanned with CamScanner